# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

edu.palghar@gmail.com
Email Id : ssazppalghar@gmail.com

जा.क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ./वशी/१८७/२०१७
शिक्षण विभाग (प्राथ.)
जिल्हा परिषद पालघर
दिनांक-१५/०६/२०१७

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
मिरा एज्युकेशन ट्रस्ट, ७०२ मौर्य हाउस,ऑफ न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई५३ द्वारा संचलित
ट्री हाउस हायस्कूल, यशवंत नगर, विरार (प.), विल्लागे बोळींज,
ता. वसई, जि. पालघर

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत प्रथम मान्यता इ. १ ली ते ८ वी इंग्रजी माध्यम CBSC (प्राथमिक व उच्च प्राथमिक) प्रथम मान्यतेबाबत...

संदर्भ:-१) परवानगी पत्र क्र.शिउसं/माध्य-४/स्वअशा /१६-१७/२०१६/११०२१/३८१ दि.२४/०६/२०१६
२) शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दि.१७.०६.२०१६
३) विस्तार अधिकारी, शिक्षण (मुख्या.) यांची दि. १३/०६/२०१७ ची शिफारस.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मान्यता देण्यात येते की, शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/(८५/१३)माशि १ दि.१५ जून २०१३ अन्वये असलेल्या अटी तसेच मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील अटी व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी विनियम अधिनियम १९७७ आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ नुसार तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार सादर केलेल्या अहवाल शिफारशीनुसार व मान्यतेसाठी अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे
२. संस्थेमार्फत शाळा सुरु केली असून प्रस्तावासंदर्भात कोणताही न्यायालयात दावा चालू नाही असे हमीपत्र दिले आहे.
३. संस्थेने /शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे, माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी विनियम १९७७ व महाराष्ट्र खजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदी, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.
४. शासन निर्णय दि.२७मे२०१३ मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.
५. पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला सलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार त्या अंतर्गत सुरू होणा-या शाळांना मान्यता देण्यात येत आहे.
६. संस्थेच्या शाळेत कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मान्यता घ्यावी तसेच शिक्षकांनी अर्हता ही शासनाने/मंडळाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार असेल.
७. शासनाच्या वरील आदेशानुसार संस्था जे वर्ग उघडणार आहेत त्या वर्गात मुख्याध्यापकांनी न्यायालयीन आदेश व शासन निकषांनुसार प्रवेश द्यावेत. प्रवेशाच्यावेळी, कोणत्याही प्रकारच्या देणग्या स्विकारु नये.
८. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था(कॅपीटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ महाराष्ट्र कायदा ६/८८ दि.१५/०४/१९८८ अन्वये संस्था प्रवेशाच्या वेळी अथवा तदनंतरच्या काळात कोणतीही देणगी गोळा करणार नाही किंवा तशी सक्ती विद्यार्थी/पालक/कर्मचारी यांच्यावर करणार नाही.
९. माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी विनियम १९७७ व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे पालन करेल.
सदर नेमणूक नियमानुसार
१०. शाळेत मंजूर पदानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग यांची नेमणूक करेल.

Manisha Mehta
Principal
... High School

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner